# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा

**दिनांक ०७/१२/२०२३**

### तृतीय वर्ष बी.ए. प्रवेश सूचना
### (शैक्षणिक वर्ष २०२३-२४)

मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेअंतर्गत द्वितीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेऊन उत्तीर्ण झालेल्या अथवा ATKT मिळालेल्या विद्यार्थ्यांना आणि प्रथम वर्ष बी.ए. उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी तृतीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेता येईल. सदर प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होणार असून ऑनलाईन प्रवेश अर्जाची लिंक प्रशाळेच्या http://www.unipune.ac.in/sol/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी त्यांचा कायमस्वरूपी नोंदणी (PRN) क्रमांक आणि YYMMDD या स्वरूपातील जन्मतारीख पासवर्डसाठी वापरावे आणि ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरावे. प्रवेश अर्ज व शुल्क पावती डाउनलोड करून त्याची छापील प्रत स्वत:कडे जपून ठेवावी. सदर प्रत अभ्यास केंद्रावर जमा करण्याची आवश्यकता नाही.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये मानसशास्त्र किंवा गणितशास्त्र हा विषय विशेष स्तरावर निवडला होता अशा विद्यार्थ्यांनी तृतीय वर्ष बी.ए. या वर्गामध्ये प्रवेश घेतल्यानंतर त्यांच्या अभ्यास केंद्रावर रु. १४००/- इतके प्रयोगशाळा शुल्क जमा करावे आणि अभ्यास केंद्राने दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक सत्रांना उपस्थित राहून प्रयोगवही पूर्ण करणे अनिवार्य आहे.

| | |
|---|---|
| ऑनलाईन प्रवेश अर्जाची सुरुवात | सोमवार दि. ११ डिसेंबर २०२३ सकाळी ११:०० वाजता |
| ऑनलाईन प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरण्याची भरण्याची अंतिम मुदत | सोमवार दि. २५ डिसेंबर २०२३ सायंकाळी ०५:०० वाजता |
| ऑनलाईन प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरण्याची भरण्याची अंतिम मुदत (रु. ५००/- विलंब शुल्कासहित) | मंगळवार दि. २ जानेवारी २०२४ सायंकाळी ०५:०० वाजता |
| ऑनलाईन प्रवेश अर्ज व प्रवेश शुल्क भरण्याची भरण्याची अंतिम मुदत (रु. १०००/- अतिविलंब शुल्कासहित) | बुधवार दि. १० जानेवारी २०२४ सायंकाळी ०५:०० वाजता |

**Sd/-**

**संचालक**

**मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळा**